# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Political Science

## Assignment

## Session: 2018 – 2019

PAGE :
DATE : / /

2018-2019

SEAL

नाव :- रुपाली विजय नरे

कॉलेज :- यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज

वर्ग :- B.A. I (Semister-2)

विषय :- राज्यशास्त्र

प्राध्यापकांचे नाव :- डॉ. शरद सांभारे सर

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sugat Nagar, Nagpur-15

1. प्लेटो

(इ.स. ४२७ ते ३४७)

PAGE :
DATE : / /

दीर्घोत्तरी प्रश्न

1) प्लेटोच्या न्याय सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण करा.

उ → प्रस्तावना :—

इ.स. वी पूर्व 427 मध्ये ग्रीक मधील अथेन्स ह्या नगरराज्यात प्लेटोचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब गर्भ श्रीमंत, सुख वस्तू व प्रतिष्ठित होते. त्याच्या जन्माच्या वेळी अथेन्सची लोकशाही अधोगतीला आली होती. प्लेटोच्या सुरुवातील अथेन्स मधील राजकारणात भाग घेण्याचा विचार होता. परंतु त्याच्या तारुण्य अवस्थेत त्याचा गुरु सॉक्रेटिसचा अथेन्स मधील लोकांनी विष देऊन खून केला. याचा प्लेटोच्या मनावर फार परिणाम झाला. त्याने राजकारणात सहभाग होण्याचे आपले विचार बदलवून तो तत्वज्ञानाकडे आकर्षित झाला. नंतर त्याने अथेन्स सोडून जवळपास 12 वर्ष इजिप्त, इराण, सिसली, इटलीया इत्यादी देशाच्या प्रवास केला. पुन्हा अथेन्सला परत आल्यानंतर त्याने मुक्त विश्वविद्यालयाची स्थापना केली.

अथेन्स मधील लोकांनी सॉक्रेटिस चा खून केल्यामुळे प्लेटोच्या लोकशाही वरील विश्वास कमी झाला. त्याने ~~जर~~ असे

राज्य करण्याचा विचार केला, की
जे आदर्श व न्यायी असेल त्यासाठी
त्याने विविध देशांच्या शासन पद्धतीचा
अभ्यास केला. तसेच आदर्शराज्य
बनविण्याचा त्याने प्रयत्न केला.
परंतु त्यात त्याला यश मिळू शकले
नाही. त्यामुळे तो निराश झाला. त्याने
स्थापन केलेल्या विश्व विद्यालयात
आयुष्याची ४०. वर्ष चालविले. प्लेटोचे
विश्वविद्यालय म्हणजे नंतर निर्माण झालेल्या
विश्वविद्यालयाची जननी आहे. इ.स.पू.
पूर्व ३४७ मध्ये प्लेटोचा मृत्यू झाला.

प्लेटोने अथेन्समधील लोकशाहीत
सुधारणा करणे व समाजात शिस्त निर्माण
करण्यासाठी समाजात तीन वर्ग निर्माण
करून त्यांची विशिष्ट कार्ये सांगितली.
परंतु त्या सिध्दांतात अनेक दोष असल्यामुळे
त्यावर पुढील प्रमाणे टीका केली जाते.

1) दोषपूर्ण वर्ग निर्मिती :—

प्लेटोने व्यक्तीमध्ये बुध्दी,
साहस व वासना या तीन प्रमुख
भावनांना महत्व देऊन त्या आधारावर
समाजाचे शासक, सैनिक व उत्पादक
वर्गात वर्गीकरण केले. परंतु कोणताही

PAGE :
DATE : / /

व्यक्तीत मुख्य प्रवृत्ती कायम असते. व्यक्ती मध्ये परिस्थितीनुसार भिरभिराळ्या भावना प्रबळ होऊ शकतात. प्लेटोने व्यक्तीमधील भावनेच्या आधारावर समाजाचे वर्गीकरण केल्यामुळे तिसऱ्या वर्गातील व्यक्तीला पहिल्या वर्गात कधीच जाता येणार नाही.

2) व्यक्तिविकासाला बाधक :–

मुळा व्यक्तीने विशिष्ट भावनेच्या आधारावर मुख्य कार्य करायचे असल्यामुळे व्यक्तीला मुळा व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायाची निवड करता येत नाही. त्यामुळे समाजात भारतीय वर्णव्यवस्थे सारखी त्रिवर्गीय व्यवस्था निर्माण होईल. व्यक्तीला दुसरे कार्य करण्याचे स्वातंत्र्य मिळत नसल्याने व्यक्ति विकासाला बाधा निर्माण होते.

3) अधिकाराकडे दुर्लक्ष :–

प्लेटोने आपल्या न्याय सिध्दांतात तीन वर्गाची विशिष्ट कर्तव्ये सांगितली. परंतु व्यक्तीच्या अधिकाराचा मात्र त्याने विचार केला नाही. व्यक्तीच्या विकासासाठी अधिकार आवश्यक ठरतात. मानवी स्वभावाचा विचार न करता निव्वळ

कर्तव्यावर भर देऊन त्याने मानवी अधिकाराचे दुर्लक्ष केले आहे. प्लेटोने व्यक्तीला राज्यापेक्षा दुय्यम स्थान दिले आहे.

4) मनुष्य यंत्र नाही :-

प्लेटोने आपल्या न्याय सिध्दांतात तीन वर्गाची विशिष्ट तीन कार्ये सांगितली. अशाप्रकारे कार्याच्या विभाजनामुळे व्यक्तीला जेवढी कामे सोपविली आहेत, तेवढीच करावी लागतात. ज्याप्रमाणे मुरवाद यंत्र त्याचे कार्य स्वाभाविकपणे निरंतर करीत असते. त्याच प्रमाणेच व्यक्तीने देरवील त्याचे विशिष्ट कार्य निरंतरपणे करत राहिले पाहिजे. असा प्लेटोच्या न्यायाला अर्थ आहे. म्हणजेच प्लेटोने मनुष्याच्या भावनेचा विचार न करता त्याने मनुष्याला यंत्राप्रमाणे मानले आहे. हे निश्चितच चुकीचे ठरते.

5) निरंकुश शासनाची शक्यता :-

प्लेटोच्या न्याय सिध्दांतात शासक वर्गाला अत्याधिक महत्व देण्यात आले आहे. प्लेटोने तत्वज्ञ शासकाला एवढी सत्ता दिलेली आहे की तो शासक निरंकुश

PAGE :
DATE : / /

बनण्याची शक्यता अधिक आहे. शासनकर्त्यां त्या कामात हस्तक्षेप करण्याचा अधिकार प्लेटोने कोणालाही दिलेला नाही. बुध्दीवादी वर्गाच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाल्यास शासक भ्रष्ट बनून त्यांच्याकडून सत्तेचा गैर वापर होण्याची शक्यता अधिक असते.

6) विषमतेची निर्मिती :-

प्लेटोने आपल्या न्यायसिध्दतांत शासक वर्गाला फारच महत्व दिले आहे. उत्पादक वर्ग देशाच्या व्यवस्थेचा महत्वाचा भाग असून सुद्धा त्याला राजकीय व्यवस्थेत कनिष्ठ स्थान प्लेटोने दिले. त्यामुळे मुक विशेषाधिकार प्राप्त वर्ग व दुसरा अधिकार रहित वर्ग निर्माण होऊन समाजात विषमता निर्माण होते. म्हणून प्लेटोचा न्यायसिध्दांत विषमता निर्माण करणारा आहे.

7) सद्यस्थितीत निरूपयोगी :-

प्लेटोने आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी न्याय सिध्दांत मांडला. प्लेटोच्या काळी नगरराज्यात व्यवस्था होती व राज्याचा आकारही छोटा होता. आधुनिक काळातील विशाल लोकसंख्येच्या राज्यातील लोकांना तीन वर्गात विभाजित

PAGE :
DATE : / /

करणे अशक्य आहे. त्यांची कामे निश्चित करणे सुद्धा कठीण आहे. त्यामुळे सध्याच्या स्थितीत प्लेटोच्या न्यायाचा सिध्दांत निरूपयोगी ठरतो.

Bdbew

SEAL

2. ॲरिस्टॉटल
(इ.स. 384 ते 322)

PAGE: / /

SEAL

दीर्घोत्तरी प्रश्न

1) ॲरिस्टॉटलच्या दासप्रथेसंबंधी विचारांचे टीकात्मक परीक्षण करा.

उ-> प्रस्तावना :-

ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राचा जनक म्हटल्या जाते. राज्यशास्त्राला शास्त्रीय स्वरूप मिळवून देण्याचे श्रेय ॲरिस्टॉटला जाते. ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य होता. इ. स. वि. पूर्व 384 मध्ये स्टॅगिरा यागामी ॲरिस्टॉटलचा जन्म झाला. त्याचे वडील राजदरबारी वैद्य होते. त्याचे बालपण राजदरबारात आणि दरबारातील लोकांच्या सहवासात गेले. त्यामुळे राज्यकारभाराची बरीच माहिती त्याला मिळाली. ॲरिस्टॉटलच्या काळात ग्रीक मधील लोकशाहीचा अस्त झाला होता. तेथे धनिक लोकांचे राज्य निर्माण झाले होते. तो वयाच्या 18 व्या वर्षी अथेन्समध्ये येऊन प्लेटोच्या ॲकॅडमित भर्ती झाला. त्याने जवळपास 20 वर्षे ॲकॅडमित गेले.

प्लेटोच्या मृत्यू नंतर त्याने अथेन्स सोडले. जवळपास 12 वर्षे वगेवगळी कार्य केली. ॲरिस्टॉटलने मसीडोनियाचा राजा सिकंदर याचा शिक्षक म्हणूनही कार्य केले. अथेन्सला परत

आल्यावर त्याने आपले लिसिअम नावाचे एक विद्यालय स्थापन केले. तेथे त्याने १२ वर्ष अध्यापनाचे कार्य केले नंतर त्यांच्या आयुष्यात ~~४०~~ अनेक अडचणी आल्या अथेन्स मध्ये ॲरिस्टॉटल वर अनेक आरोप लावण्यास आहे. सॉक्रेटिस सारखी आपली स्थिती होऊ नये. म्हणून त्याने अथेन्स सोडले. इ. स. पूर्व. 322 मध्ये त्याचा मृत्यू झाला.

ॲरिस्टॉटल एक महान विचारवंत होता. त्याने तत्कालीन उपलब्ध असलेल्या 158 राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास केला. राज्यशास्त्राबरोबर त्याने नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र शरीरविज्ञान इत्यादी शास्त्रावरही लिखाण केले. त्यांच्या तत्वज्ञानाला तार्किक व वास्तवतेची जोड होती. काय असावे यापेक्षा काय आहे. यावर त्याने भर दिला त्याने प्रथमच राज्यशास्त्राला इतर शास्त्रापासून वेगळे केले. परंतु राज्यशास्त्रा च्या दृष्टीने दि पोलटीक्स The Politics आणि The constitutions हे त्याचे महत्वाचे ग्रंथ आहे.

ॲरिस्टॉटलने परिस्थिती सापेक्ष असे गुलामगिरीसंबंधी आपले विचार

मोठले आहेत. त्याने गुलामगिरीच्या प्रथेचे समर्थन करण्यासाठी तर्काचा आधार घेतला असला तरी त्याच्या विचारात अनेक उणीवा असल्यामुळे त्यावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

1) अनैतिकता व अशास्त्रीयतेवर आधारित :-

ॲरिस्टॉटलने वर्णन केलेली दासप्रथा अनैतिकतेवर व अन्यायावर आधारित आहे. मानसाचे स्वतंत्र अस्तित्व नाकारून केवळ बौद्धिक आधारावर गुलामगिरीचे समर्थन करणे चुकीचे आहे. कोणताही मनुष्य निरपेक्ष बुध्दीचा असू शकत नाही. बुध्दीवादी व निर्बुध्द ठरविण्यासाठी कोणतीही कसोटी ॲरिस्टॉटलने सांगितली नाही. प्रत्येक व्यक्तीत कमी जास्त बुध्दी असू शकते. काही व्यक्तींच्या बुद्धीचा विकास योग्य परिस्थिती न मिळाल्याने होत पूरिस्थि नाही. जर त्यांना योग्य शिक्षण मिळाले तर त्यांचा बौद्धिक विकास होऊ शकतो. ॲरिस्टॉटलने याकडे दुर्लक्ष केल्याने ही दासप्रथा अशास्त्रीय स्वरूपाची ठरते.

2) सामाजिक विभाजन चुकीचे :-

ॲरिस्टॉटलच्या मते, समाजात

समाजात काही लोक शासक म्हणून तर काही शासित म्हणून जन्माला येतात. शासक हे मालक असतात. तर शासित हे गुलाम असतात. परंतु समाजात काही अधिक बुध्दीचे, काही मध्यम बुध्दीचे व काही कमी बुध्दीचे लोक असतात. त्यातही सर्वच बुध्दीमान शासक होऊ शकत नाही. तसेच सर्वच शासक सुध्दा बुध्दीमान असतीलच असे सांगता येत नाही. कारण शासन चालविणे ही एक कला आहे. त्यामुळे समाजाचे मालक गुलाम वर्गात विभाजन करणे चुकीचे आहे.

3) नैसर्गिक समानतेकडे दुर्लक्ष :–

ॲरिस्टॉटलने नैसर्गिक आधारावर दासप्रथेचे समर्थन केले आहे. परंतु हा आधार एकांगी स्वरूपाचा आहे. कारण निसर्गाने जर काहींना बुध्दीमान व काहींना बुध्दीहीन बनविले आहे तर निसर्गानेच सर्वांना समानही बनविले आहे. याकडे ॲरिस्टॉटलने दुर्लक्ष केले आहे. अशारितीने बौध्दिक असमानतेला महत्व देणे आणि नैसर्गिक समानतेकडे दुर्लक्ष करणे चुकीचे आहे.

PAGE :
DATE : / /

4) ग्रीकांविषयी फाजील अभिमान :-

ऑरिस्टॉटल ग्रीक लोकांना सुसंस्कृत माणूस इतर रानटी असतात असे म्हटले आहे. ग्रीकांनी युध्दात पराभूत केलेल्या लोकांना कायदेशीर गुलाम बनवावे असे तो म्हणतो. परंतु ग्रीकांच्या जर युध्दात पराजय झाला तर त्यांना गुलाम बनविण्यात येऊ नये. कारण ते जन्मतःच शासक म्हणून जन्माला आलेले असतात. असा तर्क मांडून ग्रीकांविषयी त्याने फाजील अभिमान बाळगला आहे.

5) विसंगतीपूर्ण विचार :-

ऑरिस्टॉटलने एकीकडे दासप्रथा आवश्यक व स्वाभाविक आहे असे म्हणतो तर दुसरीकडे जे गुलाम स्वतंत्र जीवन जगण्यास लायक असतील त्यांना दासप्रथेतून मुक्त करावे असे म्हणतो. तसेच समाजासाठी गुलामगिरी आवश्यक आहे व गुलाम हे मालकांची संपत्ती आहे असे एकीकडे म्हणतो व दुसरीकडे यांच्या सोबत प्रेमाचे व मैत्रीचे संबंध ठेवण्याचा सल्लाही देतो. अशा प्रकारची ऑरिस्टॉटलच्या विचारात विसंगती दिसून येते.

PAGE :
DATE : / /

6) सद्यस्थितीत निरुपयोगी :-

ॲरिस्टॉटलचे दासप्रथेसंबंधी विचार समता व स्वातंत्र्याच्या विरोधी आहे. आजच्या लोकशाहीच्या युगात ही दासप्रथा निरुपयोगी ठरते. ॲरिस्टॉटलच्या दासप्रथेसंबंधी सिध्दांत लागू केल्यास समाजातील बहुसंख्य लोक गुलाम बनतील. आज लोकशाहीच्या युगात सर्वांना समान संधी, स्वातंत्र्य व न्याय देण्याची हमी देण्यात आलेली असते. त्यामुळे सद्यस्थितीत ॲरिस्टॉटलचे दासप्रथेसंबंधी विचार उपयोगी नाहीत.

7) सामाजिक एकतेला घातक :-

समाजात जर मालक व गुलाम असे दोन वर्ग निर्माण झाले तर हे सामाजिक एकतेला घातक असते. श्रेष्ठ-कनिष्ठ, शासक - शासित, बुध्दीमान - बुध्दीहीन असे समाजाचे विभाजन केल्यास सामाजिक एकता निर्माण होणार नाही. त्यामुळे समाजात संघर्ष गोंधळ व अराजकता निर्माण होण्याची शक्यता असते. अब्राहम लिंकनच्या मते, "ज्या राज्यात अर्धे स्वतंत्र किंवा अर्धे गुलाम असतील ते राष्ट्र जिवंत राहू शकत नाही."

PAGE: DATE: / /

8) मानवतेचा अपमान :-

ॲरिस्टॉटलने दासप्रथा समाजाला आवश्यक व उपयोगी मानून त्याचे स्वातंत्र्य व समानतेचे अधिकार नाकारले आहेत. मानवी अधिकाराकडे दुर्लक्ष करुन गुलामगिरीचे (दासप्रथेचे) समर्थन करणे चुकीचे आहे. ज्यांच्या श्रमामुळे नागरिकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होतात त्या बहुसंख्याकांना अधिकार व सवलतीपासून वंचित ठेवणे म्हणजे एकप्रकारे मानवतेचा अपमान करणे होय.

9) जनावरांप्रमाणे व्यवहार अयोग्य :-

ॲरिस्टॉटलने सजिव संपत्ती मध्ये हत्ती, घोडे गुलाम यांचा समावेश केला. दासांची (गुलाम) तुलना पाळीव प्राणी व जनावरांप्रमाणे करणे व त्यांना कुटुंबाची संपत्ती मानणे अयोग्य आहे. बार्करच्या मते, माणूस हा सर्व दृष्टीने प्रथम माणूस आहे. त्यामुळे ॲरिस्टॉटलचा दासप्रथेचा सिध्दांत स्वातंत्र्य विरोधी आहे.

ॲरिस्टॉटलने तर्काच्या आधारावर गुलामगिरीचे समर्थन केले. परंतु ॲरिस्टॉटलसारख्या एका तत्वज्ञाने दासप्रथेसारख्या अमानुष व अनैसर्गिक

पध्दतीचे समर्थन करणे ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. दासप्रथेचे कोणत्याही आधारावर व कोणत्याही परिस्थितीत समर्थन करता येऊ शकत नाही.

3. जॉन स्टुअर्ट मिल
(इ.स. 1806 ते 1873)

PAGE:
DATE: / /

दिर्घोत्तरी प्रश्न

1) मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचाराचे टीकात्मक परीक्षण करा.

उ→ प्रस्तावना :—

मुक्त व्यक्तिस्वातंत्र्यवादी, उपयुक्ततावादी आणि प्रतिनिधिक लोकशाही व्यवस्थेचा पुरस्कार करणारा विचारवंत म्हणून जॉन स्टुअर्ट मिलचे वर्णन करावे लागते. 20 मे 1806 रोजी लंडन येथे मिलचा जन्म झाला. जॉन स्टुअर्ट मिलचे वडील जेम्स मिल हे बेंथमचे शिष्य होते. वडीलांकडून त्याला बेंथमच्या उपयोगितावादाचे आदर्श शिकविले गेले. बेंथमनंतर जॉन स्टुअर्ट मिललाच उपयोगितावादाचा समर्थक म्हणून ओळखले जाते.

जॉन स्टुअर्ट मिल लहानपणापासूनच तल्लख बुध्दीचा होता. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्याने ग्रीक भाषा व आठव्या वर्षी लॅटिन भाषा शिकण्यास सुरुवात केली. त्याची बौध्दिक झेप खुपच मोठी होती. वयाच्या बाराव्या वर्षी त्याने महान तत्ववेत्ता प्लेटो, हेरोडोटस, ॲरिस्टॉटल होमर यांचा अभ्यास केला. 1820 मध्ये त्याला फ्रांसमध्ये जाण्याचा योग आला. तेथे तो जवळपास मुक्त ~~एक~~ वर्ष निसर्ग

PAGE :
DATE : / /

सौंदर्याच्या मोकळ्या वातावरणात राहिला. फ्रांसमध्ये राहून त्याने फ्रेंच भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्याला 1823 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी मिळाली. फ्रांसमधून परत आल्यावर त्याने बेंथमच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केला.

जॉन ऑस्टिनच्या सहवासात त्याने रोमन कायद्याचा अभ्यास केला. त्याचे वक्तृत्व फारच प्रभावी होते. 1865 मध्ये तो संसदेच्या सभासद होता. सदस्य असतांना त्याने स्त्री मताधिकार, अल्प संख्यांकाचे प्रतिनिधीत्व, खुले मतदान या सारख्या पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला. त्यांचा संसदेत सर्व पक्ष आदर करत असत. परंतु प्रतिगामी विचारांच्या इंग्रज लोकांना त्याचे विचार न झेपल्याने तो पुन्हा निवडून येऊ शकला नाही.

मिलचे लेखनकार्य सातत्याने सुरू होते. नोकरी करीत असतांना व संसद सदस्य असतांनाही त्याचे चिंतन व लेखन कार्य सुरू होते. पार्लमेंटमध्ये असतांना त्याने संसदेतील सुधारणा, आयर्लंड्या प्रश्न, कामगारांचा प्रश्न आणि निग्रोवरील अत्याचार अशा विविध प्रश्नांवरील आपली मते त्याने संसदेत स्पष्टपणे मांडली. त्यामुळे त्याला पक्षाचा रोषही सहन करावा लागला. वयाच्या पंचविसाव्या वर्षी मिल हॅरिएट टेलरच्या

सहवासात आला. ती त्याच्या मित्राची पत्नी होती. तिचे सौंदर्य, कोमलता व भावुकता त्याच्या त्याच्या जीवनाभर पडला. श्री. टेलरच्या मृत्यूनंतर त्याने तिच्याशी विवाह केला. परंतु दुर्दैवाने विवाहानंतर अवघ्या सात वर्षातच तिचे निधन झाले. त्याने आपले "On Liberty" हे पुस्तक तिलाच अर्पण केले. आपल्या लिखाणाची प्रेरणा, उत्कृष्ट भावना व श्रेष्ठत्व हा सर्व भाग आपल्या पत्नीच्या प्रेमाचा परिणाम असल्याचे त्याने मान्य केले. इ. स. 1873 मध्ये त्याचा मृत्यू झाला.

1) राज्याच्या सकारात्मक कार्याकडे दुर्लक्ष :-

व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे समाजाचे व राज्याचे व्यक्तीवर नियंत्रण असू नये असे मिल म्हणतो. परंतु आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या समाजात हा दृष्टिकोन नकारात्मक व अपूर्ण आहे. व्यक्ती विकासाची अनेक कामे राज्याला करावी लागतात. राज्याला सकारात्मक कार्य करून व्यक्तिविकासाला हातभार लावावा लागतो. परंतु मिलने राज्याच्या नकारात्मक कार्याला महत्व देऊन सकारात्मक कार्याकडे दुर्लक्ष केले आहे.

2) स्वातंत्र्य रक्षणाचे उपाय नाही :-

मिलने व्यक्तीस्वातंत्र्याचे महत्त्व अतिशय प्रभावीपणे वर्णन केले आहे. परंतु स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे प्रभावी मार्ग किंवा उपाय सांगितले नाही. बार्करच्या शब्दांत, मिल पोकळ स्वातंत्र्य आणि काल्पनिक समर्थन करणारा प्रेषित आहे.

3) कार्य स्वातंत्र्याची विभागणी अयोग्य :-

मिलने कार्य स्वातंत्र्याचे व्यक्तिगत कार्य व सामाजिक कार्य असे दोन भागात विभाजन अयोग्य व चुकीचे आहे. व्यक्तीच्या प्रत्येक कार्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत असतो. उदा. दारु पिणे हे व्यक्तिगत कार्य आहे. परंतु त्याच्या दारु पिण्याचा परिणाम कुटुंबातील इतर सदस्यांवर व समाजावर पडत असतो. त्यामुळे अशा दुर्व्यसनी कार्यावर राज्याचे नियंत्रण आवश्यक असते.

4) राज्याच्या हस्तक्षेप वाढण्याची शक्यता :-

मिलने सामाजिक कार्याच्या संदर्भात राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार

PAGE :
DATE :

दिला आहे. व्यक्तीच्या सामाजिक कामांचा इतर व्यक्तींवर वाईट परिणाम होणार असेल तर राज्याने समाजाच्या हितासाठी त्यावर बंधने घालणे आवश्यक आहे असे मिल म्हणतो. परंतु असा अधिकार राज्याला दिल्यास राज्य व्यक्तीच्या प्रत्येकच कामात हस्तक्षेप करेल व व्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता राहिल.

5) सामाजिक कल्याण होणार नाही :-

मिलने समाजातील सर्वांना पूर्ण विचार स्वातंत्र्य दिले आहे. परंतु समाजात सर्व व्यक्ती सारख्या नसतात. सर्वांना समान स्वातंत्र्य दिल्या मुळे अपराध्यांना सुवर्ण संधीच मिळेल. समाजातील अशा अपराधी प्रवृत्तीच्या लोकांना पूर्ण स्वातंत्र्य देणे म्हणजे माकडांच्या हाती कोलीत देण्यासारखेच आहे. वास्तविकत: अशा अपराधी प्रवृत्तीवर उचित बंधने आवश्यक ठरतात. अपराधी व विकृत मानसांना स्वातंत्र्य दिल्यास समाजाचे कधीच कल्याण होणार नाही.

6) व्यक्तीच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष :-

मिलने विचार आणि कार्याच्या स्वातंत्र्याचा विचार करतांना व्यक्तीला त्याच्या कार्याबद्दल जबाबदार धरले नाही. कोणत्याही गोष्टीची जबाबदारी निश्चित केल्याशिवाय त्याला योग्य उपयोग होऊ शकत नाही. अशा प्रसंगी व्यक्ती स्वैराचारी वृत्तीने वागेल. त्यामुळे समाजात कायदा व सुव्यवस्था कायम राहणार नाही. जबाबदारीच्या तत्वाकडे दुर्लक्ष करणे राज्याच्या स्थिरतेसाठी धोकादायक ठरते.

7) अप्रजातांत्रिक विचार :-

मिल व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभावी पुरस्कर्ता आहे. व्यक्ती विकासासाठी व समाज विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. परंतु त्याने अविकसित देशातील व मागासलेल्या देशातील लोकांना स्वातंत्र्य नाकारले आहे. त्याने केवळ विकसित देशातील लोकांच्या स्वातंत्र्याचा विचार करून अविकसित देशावर व तेथील जनतेवर अन्याय केला आहे. स्वातंत्र्याचा मुक्त पुरस्कार करणाऱ्या मिलने अविकसित देशातील लोकांच्या स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजेच हे त्याचे विचार अप्रजातांत्रिक वाटतात.

अशाप्रकारे मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी

विचारात अनेक दोष आहेत, हे खरे असले तरी आज अनेक देशांच्या संविधानात स्वातंत्र्याच्या अधिकाराचा जो समावेश करण्यात आला आहे त्याचे श्रेय मिलला द्यायला पाहिजे. म्हणूनच मिलचे स्वातंत्र्यासंबंधी विचार राज्यशास्त्राला मिळालेली देणगी आहे हे मान्य करावेच लागते.

Bdbau

Principal
Sahodri Girls Arts & Commerce College, ... Nagar, Nagpur-15

Sambare

2018-2019

SEAL